16-17


।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

NATIONAL SERVICE SCHEME

Phone 02462 229242, Fax 02462 2. 74 www.srtmun.ac.in E-Mail : srtmun.ns


जा.क्र. : रासेयो/२०१७–१८/ 2744-

दिनांक : ०५.०२.२०१८ (०७)

प्रति,

मा.कुलसचिव

प्रस्तुत विद्यापीठ

विषय:— **वार्षिक अहवाला बाबतची माहिती स्विकारणे बाबत.**

संदर्भ :—आपले विभागाचे पत्र क्र. विशेष कक्ष/वा.अ./२०१७–१८/३५९ दि.१५.०१.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३६ (१) अन्वये ०१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ या कालावधीचा विद्यापीठाचा वीसावा वार्षिक अहवाल प्रकाशित करावयाचा असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागाची माहिती या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

सदरील माहिती स्विकारून सहकार्य करावे हि विनंती.

प्रा.एन.व्ही.कांबळे.

रासेयो कार्यक्रम समन्वयक,

प्रस्तुत विद्यापीठ

Received

07/02/18

Scanned by CamScanner

# राष्ट्रीय सेवा योजना संक्षिप्त अहवाल

(दि. 01 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017)

विद्यापीठाचे नांव :— **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**
संपर्क: दूरध्वनी कमांक: २२९२४२, २२९२४३, विस्तार :१२४, १६४, एस टी डी कोड :०२४६२
फॅक्स कमांक:०२४६२— २२९५७२, २२९२४५
ईमेल : Prof.nv.kamble@gmail.com सांकेतिक स्थळ : www.srtmun.ac.in

**स्वयंसेवक संख्या एकुण मुले ८५५७ + मुली ६२९३ = १४८५०**

| कार्यक्रम अधिकारी जिल्हानिहाय | एकुण | स्त्री | पुरूष | प्रशिक्षित | अप्रशिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| १.नांदेड | ७५ | १३ | ६२ | ५२ | २३ |
| २.लातुर | ६९ | १२ | ५७ | ५१ | १८ |
| ३.परभणी | ३६ | ०९ | २७ | २६ | १० |
| ४.हिंगोली | १८ | ०४ | १४ | १२ | १६ |
| एकुण | १९८ | ३८ | १६० | १४१ | ५७ |

| उपक्रम | शिबीर संख्या | स्वयंसेवक | लाभार्थी |
|---|---|---|---|
| पल्स पोलिओ लसीकरण | १०५ | २१५० | ३९५० |
| आपत्ती व्यवस्थापन | ७४ | १९४५ | ७१०० |
| आरोग्य विषय शिबीरे | ११० | ५३१५ | ९७४० |
| रक्तदान | ६५ | २३०५ | २९३५ |
| वृक्षारोपन | ८२ | ११६४० | ७५०० |

रक्त बाटल्या संकलन संख्या २९३५ वृक्षारोपन संख्या ७५००

## नियमित कार्यक्रम उपक्रमात राबविलेले विविध विषय

०१. रक्तदान अभियान/रक्त गट तपासणी/रक्तदान/आरोग्य तपासनी/पल्स पोलिओ
०२. वृक्षारोपन अणि वृक्षसंवर्धन
०३. एड्स विरोधी जनजागृती
०४. व्यसनमुक्ती/तनावमुक्तीसाठी कार्यक्रमाचे आयोजन
०५. पर्यावरण जनजागृती व परिसर स्वच्छता,आरोग्य,व पाणी प्रश्न
०६. कार्य प्रसिध्दी सप्ताहातुन विविध कार्यक्रमाची माहिती प्रसार
०७. वाहतुक सुरक्षा बाबत कार्यशाळेचे आयोजन
०८. पोस्टर,निबंध,आदि द्राव्य संाधनातुन उर्जा बचत व संवर्धन
०९. कन्या भ्रुन हत्या बाबत समाजप्रबोधन
१०. प्रवेश महोत्सव कालावधीत शिस्त पालन समितीचे कार्य
११. आपत्ती व्यवस्थापन अणि निवारा
१२. जलसंवर्धन व पानलोट १३. ग्रामीण भागात जलसंवर्धनाबाबत प्रबोधन
१४. मतदार नोंदणी व मतदान जनजाग्रती अभियान
१५. शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण व जनजाग्रती
१६. स्वच्छ भारत अभियान
१७. कॅशलेस व्यवहार कार्यक्रम

Scanned by CamScanner

नियमित शिबीरे एकुण :— ९९ मुले : ३८६३ मुली : २५६०

उपक्रमात राबविलेले विविध विषय :—

०१. शौचालय निर्मिती,सांडपाणी व्यवस्थापन,शुध्दजल सुविधा बाबत प्रबोधन
०२. रक्तदान व रक्तगट तपासनी.
०३. दगडी व मातीचे बंधारे बांधुन पानलोट बाबत जनजाग्रती
०४. ग्राम सर्वेक्षण आणि रोजगार निर्मितीसाठी प्रबोधन
०५. व्यसनमुक्ती,व्यसनाचे दुष्परिणाम इत्यादि बाबत कार्यक्रमाचे आयोजन
०६. महिला अरोग्य शिबीरातुन आरोग्य संवर्धन
०७. बचत गटाच्या मार्फत विविध जीवनपयोगी वस्तुची निर्मिती व स्वंयरोजगार उपलब्धता
०८. पशुरोग निदान शिबीर
०९. अंधश्रध्दा निर्मुलन व वैज्ञानिक दृष्टिकोन
१०. आपत्ती व्यवस्थापन
११. जलसंवर्धन व पाणलोट व्यवस्थापन
१२. स्वच्छ भारत अभियान

नाविण्य पुर्ण उपक्रम :—

०१. मतदान नोंदणी व मतदान जनजागृती अभियानात पथनाटय,घोषवाक्य देवून अभियान राबविण्यात आले.
०२. आरोग्य तपासनी शिबीरातुन शालेय मुलांची आरोग्य तपासनी
०३. रॅगीगंचे दुष्परिणाम व रॅगींग विरोधी कायदा.
०४. रस्ता सुरक्षा अभियान
०५. स्वच्छ भारत अभियान
०६. अवयवदान रॅलीचे आयोजन

जिल्हा निहाय वार्षिक खर्चाचे केंद्रिय पध्दतीने अंकेक्षन

| अ.क्र. | अंकेक्षन स्थळ | दिनांक | सहभागी कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|---|
| ०१ | बसवेश्वर महाविद्यालय,लातुर | १९ व २० मे २०१७ | ४० |
| ०२ | ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी | २१ मे २०१७ | २३ |
| ०३ | यशवंत महाविद्यालय, नांदेड | २५मे २०१७ | ३८ |

वार्षिक कार्यक्रम नियोजन बैठक

| अ.क्र. | स्थळ | दिनांक | सहभागी कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|---|
| ०१ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | २९.०८.२०१६ | १८५ |

वार्षिक कार्यक्रम अधिका—यासाठी वार्षिक मुल्यांकन कार्यशाळा

| अ.क्र. | स्थळ | दिनांक | सहभागी कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|---|
| ०१ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | २९.०३.२०१७ | १७५ |

रा.से.यो सल्लागार बैठक

| अ.क्र. | अंकेक्षन स्थळ | दिनांक | सहभागी सदस्य |
|---|---|---|---|
| ०१ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (व्यस्थापन समिती) | १३.१२.२०१६ | सर्व सदस्य |

Scanned by CamScanner

### जिल्हास्तरीय शिबीराचे आयोजन:

| अ. क्र. | स्थळ | विषय | सहभागी स्वयंसेवक | | कार्यक्रम अधिकारी सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| ०१ | ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी जि.परभणी (परभणी व हिंगोली) | जिल्हास्तरीय युवक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीर | ७० | ३० | ०७ |
| ०२ | संजीवनी महाविद्यालय, चापोली जि. लातुर | जिल्हास्तरीय युवक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीर | ६० | ४० | ०७ |

### विद्यापीठस्तरीय शिबीराचे आयोजन:

| अ. क्र. | स्थळ | विषय | सहभागी स्वयंसेवक | | कार्यक्रम अधिकारी सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| ०१ | स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड ०४ सप्टेंबर २०१६ | राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन पूर्व तयारी राज्यस्तरीय निवड शिबीर | ६७ | ४० | १० |

### युवती कार्यशाळा:

| अ. क्र. | स्थळ | विषय | सहभागी स्वयंसेवक | | कार्यक्रम अधिकारी सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| ०१ | पीपल्स महाविद्यालय,नांदेड २२ ते २४ फेब्रुवारी २०१७ | विद्यापीठ स्तरीय युवती कार्यशाळा | .. | ८९ | ०४ |

**युवती कार्यशाळेतील प्रमुख विषय:—**

व्यक्तीमत्व विकास व कौशल्य विकास महिला, सबलिकरण,कन्या भ्रुण हत्या,देहदान,नेत्रदान,हुंडा, बंदी,भ्रष्टाचार निर्मुलन वैज्ञानिक दृष्टिकोन, विवाह पूर्व समुपदेशन, एड्स आदि रोगाबाबत प्रबोधन महिला व त्यांचे आरोग्यविषयक प्रश्न.

**उत्कर्ष:सामाजिक:सांस्कृतिक सहभाग माहिती:—**

दि. २६ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०१७ दरम्यान सावीत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक उत्कर्ष युवक महोत्सवात (०९ मुले + ०९ मुली+०२ कार्यक्रमअधिकारी) एकुण १८ स्वयंसेवकांनी विविध स्पर्धात सहभाग घेवून नाविण्यपूर्ण प्राविण्य प्राप्त केले.विद्यापीठाच्या संघाने पथसंलनामध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषीक प्राप्त केले. संघाचे नेतृत्व डॉ.बी.एम.कुंचलवाड, नागनाथ महाविद्यालय,औंढानागनाथ आणि डॉ.एस.व्ही.कदम राजर्षी शाहु महाविद्यालय,परभणी यांनी केले.

**पुरस्कार प्राप्त: राष्ट्रीय सेवा योजनेला प्राप्त झालेल्या पुरस्काराची माहिती**

०१.राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रमअधिकारी पुरस्कार २०१५—१६ प्रा.डॉ.शिवराज बोकडे (यशवंत महाविद्यालय नांदेड) यांना प्राप्त झाला.

०२.राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका कु.रेखा गोंविदराव गोकावार (लालबहादुर शास्त्री महा.धर्माबाद जि.नांदेड हयास प्राप्त झाला.

Scanned by CamScanner

०३.सन २०१५–१६ चा राष्ट्रीय पातळीवरील इंदिरागांधी (आय जी) पुरस्कार यशवंत महाविद्यालय,नादेड व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.शिवराज बोकडे यशवंत महाविद्यालय,नांदेड यांना प्राप्त झाला.

**राष्ट्रीय एकात्मता शिबीरे सहभाग व माहिती :–**

०१.राष्ट्रीय पातळीवरील, **National Integration Camp,with Anuraj Group of Institution Venkatapur Ghatkesar (M) Hyderabad** येथे दि. २४ ते ३० ऑक्टोंबर २०१६ या कालावधीत आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबीरांचे आयोजन करण्यात आले, सदर शिबीरासाठी ०४ मुले व ०४ मुली व ०१ संघव्यवस्थापक म्हणुन प्रा.डॉ.शिवराज बोकडे यशवंत महाविद्यालय नांदेड यांनी काम पाहिले.

०२.राष्ट्रीय पातळीवरील,राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपुर येथे दि. १५ ते २१ ऑक्टोंबर २०१६ या कालावधीत आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबीरांचे आयोजन करण्यात आले, सदर शिबीरासाठी ०१ मुले व ०१ मुली पाठहवण्यात आले.

**साहसी किडा शिबीरे/मेघा शिबीरे :–**

१.उच्च व तंत्र शिक्षण विभाग रा.से.यो.महाराष्ट्र शासन, मुंबई आणि संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती यांच्या वतीने दि. १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०१७ दरम्यान चिखलदरा येथे आयोजित राज्यस्तरीय युवा साहस शिबीरात ०४ स्वयंसेवक व ०३ स्वयंसेविका यांनी सहभाग घेऊन शिबीर यशस्वीपणे पुर्ण केले. संघनायक म्हणुन शिवाजी महाविद्यालय,उदगीर येथील कार्यक्रमअधिकारी प्रा.टेकाळे ए.एस. यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

२.युवा व खेल मंत्रालय भारत सरकार व उच्च व तंत्र शिक्षण विभाग रा.से.यो.महाराष्ट्र शासन, मुंबई व अटल बिहारी बाजपेयी इनिस्टयुट ऑफ माउंटेरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस सोंलग–मनाली (हिमाचल प्रदेश) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ ऑक्टोंबर २०१६ ते ०४ नोंव्हेंबर २०१६ दरम्यान अटल बिहारी बाजपेयी इनिस्टयुट ऑफ माउंटेरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस सोंलग–मनाली (हिमाचल प्रदेश) येथे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील साहसी शिबीरात ०५ स्वयंसेवक व ०५ स्वयंसेवीका यांनी सहभाग घेऊन शिबीर यशस्वीपणे पुर्ण केले.संघनायक म्हणुन संत जनाबाई महाविद्यालय,गंगाखेड येथील परभणी जिल्हयाचे जिल्हासमन्वय प्रा. डॉ.पी.आर.सुर्वे यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

**राज्य/राष्ट्र प्रजासत्ताक दिन संचलन शिबीरे:–**

१.राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पुर्व संचलन निवड शिबीर दि. १७ ते १९ सप्टेंबर २०१६ दरम्यान शिवाजी विद्यापीठ,कोल्हापुर येथे आयोजित शिबीरात विद्यापीठाचे संघात ०७ मुले व ०७ मुलींनी सहभाग नोंदविला.संघाचे नेतृत्व प्रा. अमर तांदळे, व प्रा.डॉ.जी.पी.कापुरे, नांदेड यांनी केले.

२.राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन,दादर मुंबई येथे १) जाधव रामदास ,देगुलूर महाविद्यालय, देगलूी जि. नांदेड २) गजगे अमोल अशोक, ३) कांबळे अजय नरसिंग, ४) कु.गुटटे रूपाली राजर्षी शाहु

Scanned by CamScanner

महाहाविद्यालय,लातुर ५) कु.चौधरी अर्चना अनंतसिंग, एन एस बी महाविद्यालय,नांदेड यांनी दि.१६ ते २८ जानेवारी २०१७ दरम्यान राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनात सहभाग नोंदवून उत्कृष्ट पथसंचलन केले.

३.राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संलचन पूर्व तयारी निवड शिबीर दि.०८ ते १७ ऑक्टोंबर २०१५दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महराज नागपुर विद्यापीठ, नागपुर येथे ०३ स्वयंसेवक व ०१ स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदविला.

४.राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या दि. ३० डिसेंबर २०१६ ते ०२ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या युवया खेल मंत्रालय, भारत सरकारच्या वतनी संपन्न झालेल्या २६ जानेवारी २०१७ च्या प्रजासत्ताक पथसंचलन राजपथ नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमास शिवाजी महाविद्यालय उदगीर जि.लातुर येथील स्वयंसेविक सोमेश पाटील तसेच राजर्षी शाहु महाविद्यालय लातुर येथील कु. डोनगांवे सोनाली यांनी विद्यापीठ व महाराष्ट्राचे नेतृत्व केले.

**कार्यक्रम अधिकारी जिल्हासमन्वयक/कार्यक्रम समन्वयक यांच्या पुढाकारानसये आयोजित केलेले विशेष कार्यक्रम:—**

०१. रासेयो उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले व वार्षिक कायक्रमासाठी नियोजन आराखडा तयार करण्यात आला.

०२. वार्षिक खर्चाचे केंद्रिय पध्दतीने जिल्हास्तरीय अंकेषन मा. सनदी लेखापाल यांचे कडून करून घेण्यात आले.

०३. जिल्हास्तरीय युवा नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले.

०४. विविध महाविद्यालयातुन आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यासाठी समन्वयकांनी पुढाकार घेतलेला आहे.तसेच आव्हाण २०१६ साठी स्वयंसेवक निवड प्रक्रियेतुन योग्य त्या स्वयंसेवकांची निवड करण्यात आली.

०५. जिल्हा समन्वयक यांच्या सहकार्याने प्रजासत्ताक दिन संचलनासाठी स्वयंसेवक निवड तसेच युवा साहस शिबीरासाठी स्वयंसेवकाची निवड, राज्यस्तरीय शिबीरासाठी स्वयंसेवक इत्यादि प्रक्रिया पुर्ण करण्यात आली.

०६. विविध महाविद्यालयातुन मतदान नोंदणी व मतदार जागृती कार्यक्रम घेण्यात आले.

०७. स्वच्छ भारत अभियान

०८. रस्ता सुरक्षा अभियान

०९. एड्स जनजागृती रॅली.

१०. रक्तदान शिबीरे

११. विद्यापीठ स्तरीय युवती कार्यशाळेचे आयोजन.

१२. कॅशलेस व्यवहार कार्यशाळेचे आयोजन

१३. अवयवदान महारॅलीचे आयोजन

१४. मराठी भाषा गौरव दिन साजरा.

Scanned by CamScanner

**राष्ट्रीय सेवा योजना व स्वयंसेवी संस्था संयुक्ति उपक्रमाची माहिती:—**

०१. महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या अंतर्गत जिल्हा स्तरीय कार्यालयामार्फत एड्स जनजागृतीसाठी उपक्रमाचे आयोजन करून विविध स्पर्धाच्या माध्यमातुन जनप्रबोधन करण्यात आले.

०२. राष्ट्रीय बाल कामगार निर्मुलन आयोग यांच्या मदतीने जिल्हा निहाय शाखेच्या मदतीने मा. जिल्हाधिकारी यांच्यासहकार्याने शाळा बाहय मुलांचे सर्वेक्षण करून शैक्षणिक गळती थांबविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

०३. शहरी व ग्रामीण भागातील पाणीवाटप संस्था,बचत गट इत्यादिच्या माध्यामातून नैसर्गिक साधन संपत्ती संवर्धनासाठी प्रबोधन करून नैसर्गीक साधन संपत्तीची जपणुक करण्याच्या दृष्टीकोनातुन म्हत्वपुर्ण कार्य केले आहे.

०४. शासकिय रूग्णालय रक्तपेढी तसेच इतर रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करून गरजू रूग्णाला जीवदान दिले आहे. हे वैशिष्टयपूर्ण कार्य समाजाच्या दृष्टीने लाख मोलाचे आहे.

०५. महाराष्ट्र राज्य महामार्ग पोलीस,मुंबई आणि रा.से.यो. यांचे संयुक्त विद्यमाने वाहतुक सुरक्षेबाबत निबंध, पोस्टर,स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

०६. मा.राज्य संपर्क अधिकारी, रा.से.यो.कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पत्रानुसार प्रस्तूत विद्यापीठ अंतर्गत रा.से.यो.संलग्नीत महाविद्यालयात अवयव दान (Organ donation) व थॅलेसेमिया (Thalasseia) चाचणी सबंधाने विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करून देण्यात आली. . .

०७) रा.से.यो.संलग्नीत विविधी महाविद्यायात नियमित कार्यक्रमा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतील रा.से.यो. स्वंयसेविका (मुली) साठी एक दिवशीय स्वंय संरक्षण प्रशिक्षणाचे (Self defence training programme) चे आयोजन करण्यात आल.

०८) भारत जोडो युवा अकादमी आयोजित श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर किनवट जि. नांदेड येथे विद्यापीठाच्या रासेयोच्या वतीने स्वयंसेवकाने सहभाग नोंदविला.

०९) राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबीराचे आयोजन आर.जी.बागडिया कला, एस.बी.लेखोटिया वाणिज्य आणि आर.बझंझी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे आयोजीत शिबीरात प्रस्तूत विद्यापीठाच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

१०) अवयवदान महारॅलीचे अयोजन

**प्रसारमाध्यमाचा उपयोग:— वृत,लेख,मुंलाखत संबधित माहिती**

दि. २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर २०१६ दरम्यान विविध महाविद्यालयातुन कार्यप्रसिध्दी सप्ताहाचे आयोज करण्यात आले. रा.से.यो अंतर्गत आयोजन करण्यात आलेल्या कार्याची माहिती प्रसिध्द करण्यात आली.आकाशवाणी,टिव्ही इत्यादि दृकश्राव्य साधनाच्या माध्यामातून समाज प्रबोधन करण्यात आले. विविध वृतपत्रातुन लेखन व जनहितार्थ जाहिरातीच्या माध्यामातुन माहितीच्या अधिकार आणि त्याचा सदउपयोग या विषयी विपुल प्रमाणात प्रसार करण्यात आला. समाज प्रबोधन पत्रिकेच्या माध्यामातुनही युवा प्रबोधनासाठी पुढाकार घेतलेला आहे.

## संपर्क

| जिल्हा | जिल्हा समन्वयकाचे नांव | भ्रम ध्वनी | कार्यालय /फॅक्स |
|---|---|---|---|
| १- नांदेड | प्रा.डॉ.मुनेश्वर एस एन | ९४२२९९६४९६ | |
| २- लातूर | प्रा.डॉ.पवार पी टी | ९४२१६९३७६७ | |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३- परभणी | प्रा.डॉ.सुर्वे पी आर | ९४२३९५८९६३ | |
| ४- हिंगोली | प्रा.डॉ. किर्तनकार आर व्ही | ९४२१४८९९११ | |
| सहा. अधिक्षक, राष्ट्रीय सेवा योजना | श्री.एस.के.कांबळे रा.से.यो.विभाग | ९४०५७८७०७२ | ०२४६२ २२९२४२, ४३ विस्तारीत १२४, (कार्यालय) |
| कार्यक्रम समन्वयकाचे नावं व पत्ता | प्रा.एन.व्ही.कांबळे हर्ष नगर, नांदेड | ९४२२७१९३७२ | ०२४६२ २२९२४२, ४३ विस्तारीत १६४ (कार्यालय)) |

**विविध कार्यशाळांची माहिती:—**

स्त्री भ्रुण हत्या विरोधी जनजागृतीच्या दृष्टीने विविध महाविद्यालयातुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निबंध,वक्तृत्व,पथनाटय,पोस्टर्स,घोषवाक्य इ. माध्यामातुन एड्स रक्तदान,देहदान,उर्जाबचत आदि बाबत समाज प्रबोधनाच्या दृष्टीने महत्वपुर्ण मार्गदर्शन केले आहे.शिबीर कालावधीत वृक्षारोपन,शोष खडडे,स्वच्छता विषय राबविलेले उपक्रम,शौचालय,बांधकाम वन औषधी इ. बाबत ग्रामीण भागात माहिती पोहचविण्याचे कार्य उल्लेखनिय आहे. स्वत:सहभाग घेतल्यामुळे गावक—यामध्ये नवचैतन्य निर्माण होऊन सामाजिक बांधीलकीची जाणीव झाली.

राष्ट्रीय सेवा योजना आणि महामार्ग पोलीस महाराष्ट्र शासन,मुंबई यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विद्यापीठ स्तरावर रा.से.यो.संलग्नीत महाविद्यालयामध्ये आयोजित निबंध वक्तृत्व, पोस्टर स्पर्धेत विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला व या स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्हयातुन दोन प्रस्ताव विद्यापीठाकडे मागविण्यात आले. त्यातुन दोन प्रस्ताव अनुक्रमे संत जनाबाई महाविद्यालय,गंगाखेड जि. परभणी व जयक्रांती महाविद्यालय,लातुर यांचे प्रस्ताव महामार्ग पोलीस महाराष्ट्र शासन मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले.उच्च व तंत्र शिक्षण विभाग रासेयो विभाग,महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशानुसार खालील राज्यस्तरीय शिबीरात कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांनी सहभागी होऊन परिपुर्ण केले.

| अ.क्र. | शिबीराचे नांव | कालावधी | स्थळ | सहभागी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थासपन शिबीर आव्हाण—२०१६ | ०५ ते १७ जून २०१६ | सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे | ७९+३५ व ५ कार्यक्रम अधिकारी |
| २ | राज्यस्तरीय/ राष्ट्रीय पूर्व पथसंचलन निवड शिबीर | १७ ते. 19 सप्टेंबर २०१६ | शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर | ०७ मुले व ०७ मुली व २ कार्यक्रम अधिकारी |
| ३ | वेस्ट झोन राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पुर्व पथसंचलन निवड शिबीर | ०२ ते ११ नोव्हेंबर २०१६ | बडोदरा, गुजरात | ०२+०१ |
| ४ | राष्टीय प्रजासत्ताक पथसंचलन राजपथ नवीदिल्ली | ३०/१२/२०१६ ते ०२/०२/२०१७ | राजपथ नवीदिल्ली | ०१+०१ |
| ५ | राज्यस्तरीय पजासत्ताक पथसंचलन शिवाजी पार्क मुंबई | १६/०१/२०१७ ते २६/०१/२०१७ | शिवाजी पार्क मुंबई | ०३+०२ |
| ६ | राज्यस्तरीय प्रेरणा गुणविकास शिबीर | २४ ते २८ ऑगस्ट २०१६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपुर | ०३+०३ व १ कार्यक्रम अधिकारी |
| ७ | राज्यस्तरीय साहशी क्रिडा शिबीर | १८ ते २२ जानेवारी २०१७ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती | ०४+०३ व १ कार्यक्रम अधिकारी |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | राष्टीय पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता शिबीर | २३/०२/२०१६ ते २९/०२/२०१६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपुर | ०१+०१ व १ कार्यक्रम अधिकारी |
| ९ | राज्यस्तरीय पातळीवरील सामाजिक सांस्कृतिक राष्ट्रीय एकात्मता शिबीर | दि. २४ ते ३० ऑक्टा. २०१६ | Integration Camp,with Anuraj Group of Institution Venkatapur Ghatkesar (M) Hyderabad | ०४+०४ व १ कार्यक्रम अधिकारी |

**विशेष उपक्रम :**

१) राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नियमित कार्यक्रम व विषेष शिबीराचे अनुदानाचे वाटप रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालयांना सन २०१३–१४ पासून ऑन लाईन पध्दतीने (NEFT) व्दारे अदाईगी करण्याचे काम यशस्वीपणे राबविण्यात आले.

२) सन २०१६–१७ अंतर्गत नांदेड शहरातील ०५ रा.से.यो.संलग्नीत महाविद्यालयाच्या वतीने विद्यापीठ परिसरात दि. १७ ते २३ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत विशेष शिबीराचे यशस्वी रित्या आयोजन करण्यात आले.

३) राष्ट्रीय प्रजासत्ताक पथसंचलन सोहळा २६ जानेवारी २०१७ राजपथ नवीदिल्ली येथे संपन्न झालेल्या पथसंचलन कार्यक्रमांमध्ये शिवाजी महाविद्यालय उदगीर जि.लातुर येथील स्वयंसेविक सोमेश पाटील तसेच राजर्षी शाहु महाविद्यालय लातुर येथील कु. डोनगांवे सोनाली यांनी विद्यापीठ व महाराष्ट्राचे नेतृत्व केले.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र शासन यांच्या वतीने २०१५–१६ चा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी राज्यस्तरीय पुरस्कार राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रमअधिकारी पुरस्कार २०१५–१६ प्रा.डॉ.शिवराज बोकडे (यशवंत महाविद्यालय नांदेड) यांना प्राप्त झाला व राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका कु.रेखा गोंविदराव गोकावार (लालबहादुर शास्त्री महा.धर्माबाद जि.नांदेड हयास प्राप्त झाला.

५) युवा खेल मंत्रालय,भारत सरकारच्या वतीने सन २०१५–१६ चा राष्ट्रीय पातळीवरील इंदिरागांधी (आय जी) पुरस्कार यशवंत महाविद्यालय,नादेड व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.शिवराज बोकडे यशवंत महाविद्यालय,नांदेड यांना प्राप्त झाला.

६) आव्हाण २०१६ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे संपन्न झालेल्या आपत्ती व्यवस्थापन शिबीरात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने ७९ स्वयंसेवक ३५ स्वयंसेवीका व ०५ कार्यक्रमाधिकारी सहभागी झाले होते.

प्रा.एन.व्ही.कांबळे
कार्यक्रम समन्वयक

Scanned by CamScanner

TODAY नांदेड

शुक्रवार
९ डिसेंबर २०१६

कमाल 27.8°C किमान 12.4°C

# 'कॅशलेस' व्यवहारासाठी रासेयोची प्रबोधन फेरी

## मुखेडच्या शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालयाचा पुढाकार; विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सहभाग

मुखेड, ता. ८ (बातमीदार) : नोटबंदीमुळे नागरिकांना व्यवहारात अडचणी येत असल्या तरी काळ्या पैशाचा व्यवहाराला आळा घालण्यासाठी कॅशलेस व्यवहार प्रणाली कशी फायदेशीर आहे. याचे प्रबोधन करण्यासाठी शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतून प्रबोधन फेरी काढून मुलांना प्रशिक्षण देण्यात आले.

आज संगणकयुग असून नव्या तंत्रज्ञानाने भारलेले आहे. कालानुरूप अद्ययावत तंत्रज्ञानाचा अंगीकार केल्यास प्रगतीची वाटचाल पुढेच राहणार आहे. यामुळे सातत्याने परिवर्तन आवश्यकच आहे. त्याच तंत्रानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चलनातील एक हजार व पाचशे रुपयांच्या नोटबंदीचा निर्णय जाहीर करताच व्यवहारात अडचणी येऊनही बहुतांशी जनतेच्या मनात या निर्णयाबद्दल सकारात्मक प्रतिसादच दिसून आला. दरम्यान सर्वत्र कॅशलेस व्यवहाराची होत असलेली चर्चा पाहता जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सोमवारी प्रबोधन फेरी काढत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये रोख विरहित (कॅशलेस) व्यवहार, डिजिटल व्यवहार आणि मोबाईल बँकिंग यासंदर्भात प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.

यामध्ये मोबाईल ॲप व त्याची पारख करण्याची माहिती प्रा. डॉ. संजय कल्याणकर यांनी दिली. रोख विरहित व्यवहाराचे अॅन्ड्रॉईड मोबाईलवरील ॲप्लिकेशन कसे वापरावे यातील सुरक्षितता, संभाव्य धोके याची माहिती प्रा. डॉ. विजय गोरगिळे यांनी दिली. मोबाईल बँकिंग व कॅशलेस व्यवहारामुळे चलनातील नोटांचा वापर कमी होऊन काळ्या पैशावर कसा आळा बसेल यामुळे समाजाचा कसा फायदा व संभाव्य नुकसान टळणार आहे याची माहिती प्रा. संजीव डोईबळे यांनी दिली. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे श्री. कोकडवार व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अंबेकर यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्राची माहिती दिली. फेरीसाठी प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे, प्रा. डॉ. सोपान ढवळे, गंगाधर घाटे यांच्या मार्गदर्शनानुसार शेख मोतीपाशा, रविकांत कन्हाळे, ऋषिकेश कोलबुद्धे, मयुरी टेळकीकर, आरती कांबळे आदी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.



मुखेड : कॅशलेस व्यवहाराच्या प्रबोधनासाठी शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राध्यापक आणि बँक अधिकारी.

Scanned by CamScanner

परभणी RDX
Read Daily Exclusive
देशोन्नती परभणी / रविवार, दि. २६ फेब्रुवारी २०१७

# युवक युवती नेतृत्व विकास शिबीरास प्रतिसाद



**शहर प्रतिनिधी / २५ फेब्रुवारी**

**परभणी :** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभातर्फे जिल्हा स्तरीय युवक युवती नेतृत्व विकास शिबीराचे उद्‌घाटन २३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. ॲड. गणेशराव दुधगांवकर तर प्रमुख पाहुणे म्हणुन मनपा आयुक्त राहुल रेखावार, प्राचार्या डॉ. संध्याताई दुधगावकर, रासेयो समन्वयक प्रा.डॉ.प्रकाश सर्वे हे उपस्थित होते.

याप्रसंगी आयुक्त रेखावार यांनी मार्गदर्शन करतांना असे सांगितले की, स्वामी विवेकानंदांचे विचार जीवनात आत्मसात करून राष्ट्रीय सेवा योजनेमधून नेतृत्व विकास करून घ्यावा. यावेळी अध्यक्षीय समारोप करतांना ॲड. दुधगांवकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दशरंत इबतवार यांनी कतर सुत्रसंचलन प्रा.डॉ. पिसे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. वृषमनाथ नालटे यांनी केले. या कार्यक्रमास प्रा.डॉ. अशोक जोंधळे, प्रा. डॉ. सोंडगे, प्रा. लोमाजी, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

दै. देशोन्नती 26.2.2017

Scanned by CamScanner

रा. से. यो. विशेष शिबीर
मौ. पांगरी
23.12.16 ते 29.12.16

# शिक्षणाच्या माध्यमातुन हितकारी परिवर्तन घडविणे गरजेचे

## प्राचार्या सौ. संध्याताई दुधगावकर यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

**तालुका प्रतिनिधी / २९ डिसेंबर**



**जिंतूर :** शिक्षण हे ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यात अत्यंत महत्वपुर्ण घटक आहे. परंतु विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातुन समाजामध्ये सकारात्मक बदल घडवुन आणण्याकरीता विविध क्षेत्रातील ज्ञान संपादन करुन समाजातील नागरीकांचे हित जोपासले जाईल असे कार्य करणे गरजेचे आहे. असा कानमंत्र तालुक्यातील पांगरी येथे राष्ट्रीय सेवा विशेष शिबीराच्या समारोपा प्रसंगी प्राचार्या सौ. संध्याताई दुधगावकर यांनी शिबीरार्थ्यांना दिला.

जिंतूर तालुक्यातील पांगरी येथे मागील ७ दिवसापासुन ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराच्या समारोपा प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माजी खा. ॲड. गणेशराव दुधगावकर यांची उपस्थिती होत. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणुन ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. संध्याताई दुधगावकर, कांतराव देशमुख, नारायण महाराज देवकर, उपप्राचार्य डॉ. संजीवन कदम, सरपंच शेशीकलाबाई कामिटे, उपसरपंच केशव बुधवंत, भिमाबाई कामिटे, आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी पुढे बोलतांना सौ. संध्याताई दुधगावकर म्हणाल्या कि. समाजामध्ये व्यक्तींचा सर्वांगीन विकास होण्यासाठी पर्यावरण, प्राण्यांचा महत्वाचा वाटा आहे. परंतु अधुनिक युगामध्ये व्यक्ती स्वार्थी बनत असुन तो फक्त आपल्या स्वार्थाचा विचार करुन अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यावरणाशी खेळ करुन पर्यावरण समतोल बिघडविण्यामध्ये महत्वाची भुमीका बजावत आहे. तसेच प्राणी मात्रांवर दया न करता त्यांच्यावर ही हिंसाचार करीत आहेत. परिणाम स्वरुप निसर्गाचे चक्र पुर्णत: बिघडल्याने निसर्ग हा लहरी झाला आहे. म्हणुन विद्यार्थ्यांनी शिक्षण ग्रहन करुन स्वत च्या क्षमता ओळखुन परिसरातील विकासासाठी योगदान देवुन सामाज हितासाठी अग्रेसर रहावे असे ही ते म्हणाले. या सात दिवशीय शिबीरामध्ये सहभागी झालेल्या शिबीरार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. कारण शिबीरार्थ्यांनी सलग ७ दिवस पांगरी ग्रामस्थांमध्ये जनजागृती घडवुन आणण्यासाठी तसेच स्वच्छता व सामाजीक आरोग्य अबाधीत ठेवण्याकरीता मोलाची भुमीका बजावली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. उत्तम होलगे, डॉ. आर. एन. शेख, प्रा. डॉ. गुडडे, प्रा. श्रीधर भोंबे, प्रा. वजीर, प्रा. उत्तम जाधव, प्रा. अशोक वैद्य, प्रा. एस. एन. परिहार, प्रा. टाकरे आदींनी परिश्रम घेतले.

दै. देशोन्नती 30.12.16

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरा बोलताना प्राचार्य डॉ. संध्याताई दुधगावकर दि. 29.12.2016

दै. देशोन्नती 30.12.16

Programme Officer
National Service Scheme
Dnyanopasak College, Jintur

Principal
D.S.M. College,
Jintur Dist.Parbhani

Scanned by CamScanner